पुढारी

# उच्च शिक्षणातून सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण व्हावी

## डॉ. पी. एस. पाटील; 'विवेकानंद'मध्ये राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उच्च शिक्षणाच्या प्रत्येक शाखेच्या अभ्यासक्रमात अशा बाबींचा समावेश झाला पाहिजे. ज्यातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा विकास, नोकरीच्या संधी प्राप्त होतील. यात शिक्षक व प्रशासनाची भूमिका महत्त्वाची आहे. उच्च शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण झाली पाहिजे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.




**कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. पी. एस. पाटील. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे आदी. (छाया : पप्पू आत्तार)**

विवेकानंद महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे नॅक बंगळूर यांच्या सहाय्याने 'उच्च शिक्षणातील गुणवत्ता विकास' या विषयावर आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे होत्या. डॉ. पाटील म्हणाले, डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांतील ग्रामीण भागातील तळागाळातील सामान्य जनतेपर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचवली.

चर्चासत्राच्या दुसऱ्या सत्रात फर्ग्युसन कॉलेज पुणे येथील डॉ. समीर तेरदाळकर यांनी संशोधन प्रक्रिया व त्यासंबंधी उपलब्ध करावयाची संसाधने या विषयी विचार व्यक्त केले. तिसऱ्या सत्रात एम. यू. कॉलेज पुणे येथील माजी प्राचार्य डॉ. शिरीष चिंधडे यांनी 'नवशिक्षणातील बदलते तंत्रज्ञान' यावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक चर्चासत्राच्या संयोजिका डॉ. श्रुती जोशी यांनी केले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन प्रा.राजश्री पाटील यांनी केले. डॉ. कैलास पाटील यांनी आभार मानले.

# सोशल मीडियाचा पूरक वापर हवा

कोल्हापूर टाइम्स टीम

'निकोप वातावरणात निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी व भारतीय लोकशाही प्रगल्भ करण्यासाठी सोशल मीडियाचा योग्य वापर होणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे,' असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद अधिविभाग, कोल्हापूर प्रेस क्लब आणि पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'निवडणुका आणि सोशल मीडिया' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

देसाई म्हणाले,'देशामध्ये साधारण नऊशे दशलक्ष मतदार येत्या निवडणुकांमध्ये मतदान करणार



आहेत. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये साधारण ३२ लाख, ७५ हजार मतदार आहेत. यामध्ये १८ ते २९ या वयोगटातील सहा लाख मतदार आहेत. सोशल मीडियाचा वापर या तरुण मतदारांमध्ये जास्त प्रमाणात आहे. सोशल मीडिया

**जिल्हाधिकारी देसाई यांचे प्रतिपादन; विद्यापीठात कार्यशाळा**

ही दुधारी तलवार आहे. नागरिक आणि राजकीय पक्षांकडून निवडणुकांमध्ये सोशल मीडियाचा वापर योग्य प्रकारे झाल्यास देशाची लोकशाही मजबूत होण्यास मदत होईल. सोशल मीडियाच्या वापरासाठी राजकीय पक्षांमध्ये सुसंगती असली पाहिजे. आभासी प्रतिमा निर्माण करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. त्यामुळे या माध्यमाचा जपून वापर केला पाहिजे.'

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले,'सोशल मीडियाचा वापरापेक्षा गैरवापराकडे जास्त प्रमाणात वापर होताना दिसत आहे. सोशल मीडियाच्या वापराबाबत आचारसंहिता आलेली आहे. अशावेळी समाजामध्ये जनजागृती आणि प्रबोधन करणे हे माध्यमांची कामे आहेत.'

यावेळी छायाचित्रकार सुधाकर ओलवे यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या पत्रकारिता अधिविभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी परिचय व सूत्रसंचालन केले. यावेळी विभागीय माहिती संचालक सतीश लळीत, आयटी तज्ज्ञ राजेंद्र पारिजात, सोलापूर विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागाचे डॉ. रवींद्र चिंचोळकर, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष विजय पाटील यांच्यासह विविध शिक्षक, अधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

# नवनिर्मितीतून विकास शक्य : राऊत

कोल्हापूर : सृजनशीलता व नवनिर्मिती यातूनच विकास शक्य आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी आज येथे केले. विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभागातर्फे आयोजित 'उद्योजकता, नवनिर्मिती आणि विकासाच्या माध्यमातून मूल्यनिर्मिती' विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. डॉ. राऊत म्हणाले, ''व्यूहरचनात्मक व्यवस्थापन आणि व्यावसायिकता आज सर्व क्षेत्रांत आवश्यक आहे. बाजारपेठेचे ज्ञान, नवनिर्मिती क्षेत्रीय गरज यावरून आपला व्यवसाय वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज पाण्याचे दुर्भिक्ष सर्वत्र जाणवत आहे. भविष्यात हा प्रश्न अधिक गंभीर होणार आहे. यावर मात करून पुढील पिढ्यांसाठी पाणी उपलब्ध करणे, हे आपल्यासमोरील आव्हान असणार आहे.'' पहिल्या सत्रात प्रा. डॉ. एम. एम. अली यांनी विपणन प्रक्रियेतील नवनवीन आव्हाने विषयावर मार्गदर्शन केले. इराकमधील रियाध यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. मायाकुमारी पुरोहित यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. एस. महाजन यांनी स्वागत केले. डॉ. मारुलकर यांनी आभार मानले.

Kolhapur, Kolhapur-Today
16/03/2019 Page No. 7

# समाजशास्त्र शिकणारे समाजापासून दूर

## प्रा. डॉ. आर. इंदिरा : प्रा. कराडे यांच्या ग्रंथाचे प्रकाशन



कोल्हापूर : प्रा. डॉ. जगन कराडे लिखित 'शेड्युल्ड कास्ट एलाइटस्' या संशोधन ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी प्रा. डॉ. आर. इंदिरा. सोबत प्रा. डॉ. आर. एस. देशपांडे, प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे, प्रा. डॉ. एस. गुरुस्वामी, प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे, डॉ. आर. एस. देशपांडे आदी.

(छाया : पांडुरंग पाटील)

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

समाजामध्ये अनेक बुद्धिजीवी आहेत. अनेक जण समाजशास्त्र शिकतात; पण नेहमी समाजापासून दूर राहतात. कुठलाही विषय शिकताना प्रत्येकाने त्यामध्ये एकाग्र राहून अभ्यास केला पाहिजे, असे प्रतिपादन भारतीय समाज समाजशास्त्र सोसायटी नवी दिल्लीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. आर. इंदिरा यांनी केले.

शाहू स्मारक भवन येथे फुले, शाहू, आंबेडकर फोरमतर्फे आयोजित शिवाजी विद्यापीठाचे समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे लिखित 'शेड्युल्ड कास्ट एलाइटस्' या संशोधन ग्रंथाचे प्रकाशन प्रा. डॉ. आर. इंदिरा यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक फोरमचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हरिश भालेराव यांनी केले.

डॉ. आर. इंदिरा म्हणाल्या, शेड्युल्ड कास्ट एलाइटस्' या संशोधन ग्रंथात राज्यशास्त्र, समाजशास्त्राची भाषा वापरली गेली आहे. स्त्री-पुरुष समानतामध्ये काम करताना अनेक वेळा दरी निर्माण झाल्याचे दिसून येते. समाज हा नेहमी दोन वर्गांत विभागला गेल्याचे दिसते. यासाठी श्रेष्ठीजनांचा, अभिजनांचा वर्ग तयार झाला पाहिजे. कुठलाही विषय शिकत असताना त्यामध्ये एकाग्रता ठेवली पाहिजे.

प्रा. डॉ. आर. एस. देशपांडे, प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे, प्रा. डॉ. एस. गुरुस्वामी, प्रा. डॉ. विनोद चंद्रा, प्रा. डॉ. मनोजकुमार टिओटिया, प्रा. डॉ. उत्तमराव भोईटे, प्रा. बबनराव मोहिते, आदी उपस्थित होते.